18(0

# पुणे महानगरपालिका

**(कमेन्समेन्ट सर्टिफिकेट)**

**कार्यकारी अभियंता कार्यालय,**
बांधकाम विकास विभाग
पुणे महानगरपालिका,
शिवाजीनगर, पुणे - ४११००५.

(यापुढील पत्रव्यवहार खालील क्रमांक व दिनांक यांच्या उल्लेखासह करावा)
(जागेच्या वा इमारतीच्या कायदेशीर मालकी हक्कांचे संदर्भ लक्षात न घेता अर्जदारास हे संमतीपत्र देण्यात येत आहे.)
(अदा केलेल्या तारखेपासून एक वर्षापर्यंत लागू)

**जमीन ले आऊट (रेखांकन / भू अभिन्यास / एकत्रीकरण / विभाजन) दाखला (संमती नकाशासह)**

| | | | |
|---|---|---|---|
| प्रकरण क्रमांक : | MHW/0041/11 | क्रमांक : | CC/1632/14 |
| Proposal Type : | Residential | दिनांक : | 27/8/2014 |
| Case Type : | Revised – II | | |
| Project Type : | Layout of Building + Proposed Building | | |

श्री./श्रीमती SHRI.DHRUV SURESH MOHTA & ANNUJ UMESH GOEL व्दारा ला.स.श्री. SANJAY KUMAR GIRI (CA\2000\25800) यांस राहणार पुणे, पेठ office no 501,502,amit court behind mangala, shivajinagr महाराष्ट्र नगर रचना अधिनियम, सन १९६६ चे कलमे ४४/४५/५८/६९ व मुंबई प्रांतिक महानगरपालिका अधिनियम, सन १९४९ चे कलमे २५३/२५४ प्रमाणे पुणे महानगरपालिकेच्या सीमेतील पेठ Mohammadwadi घरांक सर्व्हे नं. 36 सि.स.न 0 हिस्सा नं. 7+8B,8A,9/1,9/2,10,11,13,14,15,16 फायनल प्लॉट क्र. 0 प्लॉट क्र. 0 (0) (सोसायटी) येथे विकास करण्यासाठी आपण महानगरपालिकेकडे दिनांक 18/7/2013 रोजी प्रस्ताव दाखल केला आहे.

उपरोक्त विकास प्रस्तावास महाराष्ट्र प्रादेशिक नगररचना अधिनियम १९९६ चे कलम ४५ नुसार विकास सुरू करण्याचा दाखला/संमतीपत्र खालील अटींवर देण्यात येत आहे. (सोबतचा संमती नकाशा ह्या संमतीपत्रकाचा अविभाज्य भाग समजणेत यावा.)

अटी :-

१. सदर प्रस्तावातील दर्शविण्यात आलेली दर्शनी अंतरे/रस्ता प्रमाण रेषा पर्यंतचे क्षेत्र पुणे म.न.पा.च्या सुचनेनुसार भविष्यात सार्वजनिक रस्त्याचा भाग राहणार आहे.

२. कोणत्याही नवीन इमारतीचा अथवा वाढीव/दुरुस्त इमारतीचा वापर अथवा वापरासाठी परवानगी वा ताबा हा कोणत्याही व्यक्तिद्वारे पुणे म.न.पा.च्या भोगवटापत्र प्राप्त झाल्याशिवाय करण्यात येऊ नये.

३. सदर संमतीपत्राची/विकास परवानगीची मुदत (काम सुरू झालेले नसल्यास) संमतीपत्राचे दिनांकापासून १ वर्षाची राहील. (सोबतचा संमती नकाशा ह्या संमतीपत्रकाचा अविभाज्य भाग समजणेत येईल.)

४. सदर संमतीपत्र हे मुदत संपल्यानंतर प्रत्येक वर्षी नुतनीकरण करणे आवश्यक आहे असे नुतनीकरण सलग तीन वेळा करता येईल. तसे न झाल्यास महाराष्ट्र प्रादेशिक आणि नगररचना अधिनियम १९६६ चे कलम ४४ अन्वये नवीन अर्ज करून संमती घ्यावी लागेल. एम.आर.टी.पी. कलम ४८ अन्वये संमतीपत्राची वैधता राहील.

५. सदरचे संमतीपत्र हे पुढील अटींचा भंग झाल्यास रद्द करण्यास पात्र राहील.
   - (अ) जागेवरील विकसन/बांधकाम हे मान्य नकाशाप्रमाणे दर्शविलेल्या/संमत केलेल्या वापरानुसार होत नसल्यास अथवा सदर ठिकाणी अनधिकृत बांधकाम/अनधिकृत वापर चालू असल्यास अटींचा भंग समजण्यात येईल.
   - (आ) सदर बांधकाम प्रस्तावातील संदर्भातील नमुद केलेल्या अटींचे उल्लंघन होत असल्यास / झाले असल्यास, पुणे म.न.पा. ने घातलेल्या निर्बंधाचे उल्लंघन झाले असल्यास अटींचा भंग झाला आहे असे समजण्यात येईल.
   - (इ) अर्जदाराने सदरची परवानगी ही गैर कृत्य करून पुणे म.न.पा. चे दिशाभूल करून प्राप्त केलेली आहे असे निदर्शनास आल्यास अटींचा भंग झाला आहे असे समजण्यात येईल. विकास नियंत्रण नियमावली नियम क्र. ६.१०, महाराष्ट्र म्युनिसिपल कॉर्पोरेशन ॲक्ट कलम २५८ अन्वये सदरची परवानगी दिशाभुल करून घेण्यात आली आहे असे समजण्यात येईल.
   - (ई) अर्जदार आणि जो इसम हा स्वत: किंवा त्याच्याद्वारे मालकी हक्काचा दावा करून महाराष्ट्र प्रादेशिक आणि नगररचना अधिनियम १९६६ चे कलम ४२ व ४५ अन्वये असलेल्या तरतुदींचे उल्लंघन करून जमीन विकसन अथवा बांधकाम करत असल्याचे निदर्शनास आल्यास, सदरची परवानगी दिशाभुल करून घेण्यात आली आहे असे समजण्यात येईल.

६. सदर संमतीपत्रावरील/लगत असलेल्या अटी व सुचना या केवळ अर्जदारास नव्हे तर भविष्यातील अर्जदाराचे सर्व वालीवारस, मुखत्यारधारक, व्यवस्थापक, प्रशासक, वारसदार आणि प्रत्येक इसम जो अर्जदाराच्याद्वारा मालकी हक्क सिध्द करेल त्या सर्वांस कायमस्वरूपी बंधनकारक राहील.

७. काम सुरू करण्यापूर्वी एन. ए. ऑर्डर दाखल करणार.

८. अकृषिक दाखला (एन. ए. ऑर्डर), यु.एल.सी. आदेश, प्रदुषण नियामक मंडळाचे आदेशातील कामगार विमा आयुक्त यांचे अटी व शर्ती बंधनकारक राहतील. वरील संमतीप्रमाणे काम करताना महाराष्ट्र म्युनिसिपल कॉर्पोरेशन ॲक्ट, महाराष्ट्र प्रादेशिक व नगररचना अधिनियम १९६६ अगर त्यास अनुसरून केलेले नियम व पोटनियम यांचा भंग होत आहे असे पुणे म.न.पा.चे निदर्शनास आल्यास सदरचे संमतीपत्र रद्द करण्याचा अधिकार पुणे म.न.पा.स राहील.
वरील संमतीपत्राविषयी काही शंका येत असेल तर कामास आरंभ करण्यापूर्वी महानगरपालिकेकडे तसे कळवून स्पष्टीकरण करून घ्यावे.

| | | |
|---|---|---|
| 27/8/14 | 28.8.14 | |
| **इमारत निरीक्षक** | **उप अभियंता** | **कार्यकारी अभियंता** |
| **बांधकाम विकास विभाग** | **बांधकाम विकास विभाग** | **बांधकाम विकास विभाग** |
| **पुणे म.न.पा.** | **पुणे म.न.पा.** | **पुणे म.न.पा.** |

अटी पुढे चालू....